# इचलकरंजी महानगरपालिका
# DAY-NULM विभाग
## जाहीर निविदा सुचना क्र.01/2025-26

इचलकरंजी महानगरपालिकेच्या DAY-NULM विभागाकडून महानगरपालिका फंड अंतर्गत खालील नमूद काम करुन घेणेसाठी अनुभवी संस्था/मक्तेदार यांचेकडून परसेंटेज रेटची जाहीर निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | बयाणा रक्कम र.रु | कोरी निविदा र.रु.GST सह | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | डे.एन.यु.एल.एम.अंतर्गत निवाऱ्याचे (साईट नं.95 नवीन निवारा) देखभाल व व्यवस्थापन करणे. | 7,97,100/- | 8,000/- | 800/- | 6 महिने |

वरील कामी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.

**अ) लिफाफा क्र .१ मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

1. बयाणा रक्कमेची इचलकरंजी महापालिका हद्दीतील राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेतील कामाची मुदत अधिक ६ महिने इतक्या कालावधीची इ.म.न.पा. च्या नांवे मुदतठेव पावती (मुळ प्रत.) अथवा धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त इ.म.न.पा.च्या नावाने काढावेत.

2.संस्था मा.धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत असावी.

3.जी.एस.टी.रजिस्ट्रेशन आवश्यक आहे.

4.अंदाजपत्रकात समाविष्ट बाबीवरील अनुज्ञेय GST संबंधी जबाबदारी निविदादारावर राहील.

5.संस्था www.ngodarpan.gov.in या पोर्टलवर नोंदणीकृत असावी त्याचा रजिस्ट्रेशन आयडी असावा.

6.रक्कम.रु.3 लाखाचे बँक सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट.

7.संस्थेचे मागील 3 वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल.

8.संस्थेचे मागील 3 वर्षाचे आयकर परतावा कागदपत्रे.

9.भारतात/राज्यात कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागाकडून काळ्या यादीत टाकले नसलेबाबतचे स्वयंघोषणापत्र.

10.संस्थेला बेघरांना निवारा, वस्तीगृह, अनाथाश्रम, वृध्दाश्रम किंवा तत्सम केंद्र चालविण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल. अशा प्रकारचा अनुभव असलेली कागदपत्रे.

11.शासनाने मंजूर केलेल्या बेघर व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्तींना सांभाळण्यास तयार असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र.

12.फॉर्म 1बी र.रु.500/- स्टँप पेपर करुन देणे आवश्यक

**ब) लिफाफा क्र .२ मध्ये खालील कागदपत्रे जोडावेत.**

१) मुळ निविदा फॉर्म मध्ये अक्षरी व अंकी नमूद केलेले दर विहीत केलेल्या जागेवर निविदाकारांने साक्षांकित केलेले असावे.

२) एस्टीमेट पेक्षा कमी दराच्या निविदा असल्यास नियमाप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेची बँक हमी जोडावी.वरील दोन्ही लिफाफे सिल करुन ते एका लिफाफ्यात सिल बंद करुन त्यावर कामाचे नांव,मक्तेदाराचे नांव स्पष्टपणे नमूद करुन सदरील लिफाफा मुदतीत DAY-NULM विभागाकडे निविदा पेटीत टाकावा.

अटी -

१) कोऱ्या निविदा इ.म.न.पा.च्या DAY-NULM विभागामध्ये दि. 01/12/२०२५ रोजी दु. २.०० वाजेपर्यंत रोखीने विकत मिळतील.

२) भरलेली निविदा इ.म.न.पा. DAY-NULM विभागामध्ये सादर करण्याची अंतिम दि. 02/12/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.

३) शक्य झालेस निविदा दि. 03/12/२०२५ इ.रोजी दुपारी ४.०० वाजता उपस्थित मक्तेदारांच्या समोर उघडणेत येईल.

३) मंजुर कामाची वर्कऑर्डर मक्तेदारास दिल्या नंतर ७ दिवसांच्या आत कामाची सुरुवात करणेची आहे.

४) अन्यथा काम रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.

५) सर्व कामाची अंदाजपत्रके तसेच अटी व शर्ती संबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

६) ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांचे बिलातून 9% इतकी रक्कम डिपॉझीट पोटी वजा करुन घेतली जाईल व काम पुर्ण झालेनंतर परत केली जाईल.

७) एस्टीमेट दरापेक्षा कमी दराच्या निविदा असल्यास प्रथत न्यूनतम देकार सादर करणाऱ्या (L1) निविदाकाराने Additional Pertormance Security Deposite म्हणून नियमाप्रमाणे राष्ट्रीयकृत बँक/शेड्यूल्ड बॅक/सार्वजनिक क्षेत्रातील बँकेचा डी.डी./ठेव पावती पाच दिवसांच्या आत इ.म.पा.कडे जमा करणे आवश्यक राहिल.

८) असमाधानकारक काम असेल तर 30 दिवसाची नोटिस देवून कामाचा मक्ता रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्तसो यांना राहिल याची नोंद घ्यावी.

9) **कोणतीही निविदा मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करणेचे अधिकार इचलकरंजी.म.न.पा.ने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.**

दि.21/11/2025

Kadam

(विद्या कदम)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका